I J R S S I S, Vol. VII, Issue (1), January 2019 : 01- 06 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# स्त्री उद्दोजकाचे स्त्रोत आणि समस्या

प्रा डॉ.सुवर्णा गंगाधर डायगव्हाणे
यशवंत महाविद्यालय, सेलू जिल्हा वर्धा

**प्रस्तावना** :–

उद्योजकता हा पुरुषांचा प्रांत आहे. पुरुषांच्या कतृत्वाकरिता राखून ठेवलेले क्षेत्र आहे, असाच पूर्वी होता. ही परिस्थिती जगातील विकसनशील देशामध्येच होती असे नाही.तर विकसीत देशामध्येही होती.परंतु अलिकडच्या काळात वादळाच्या वेगाने अनेक बदल घडून आले.आजच्या काळात विकसीत व विकसनशील अशा दोन्ही समाजांमध्ये स्त्रिया स्वतः पुढाकार घेऊन उद्दोजकाची भूमिका पार पाडण्यासाठी सिध्द झाल्या आहेत.

**स्त्री उद्दोजक म्हणजे काय?** :–“उद्दोजक” हयाची नेमकी व्याख्या करणे कठिण आहे. “स्त्री उद्दोजक” आणि “स्त्रियांची उद्दोजकता” हयाचीही व्याख्या करणे तेवढेच कठिण आहे. जेव्हा एखादी महत्वाकांक्षी आणि अभिप्रेरित स्त्री पुढाकार घेऊन उद्दोजकाची भूमिका स्वीकारते आणि ती पार पाडण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करते,तेव्हा अशा स्त्रीला स्त्री उद्योजक असे म्हणता येते.म्हणजे अशी स्त्री जी एखाद्या उद्योगाची स्थापना करते,संचालन करते, आणि त्या उद्योगाला यशस्वी करण्यासाठी काही कार्यांची जबाबदारी पार पाडते.स्त्री उद्योजकांचे कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार कमी जास्त असू शकते किंवा त्यात बदल होऊ शकतो.

**व्याख्याः** स्त्री उद्योजकांच्या उद्योगाची व्याख्या जी करण्यात आली ती स्त्रियांच्या सर्वांगिण विकासासाठी अडथळा ठरु शकते.ही बाब लक्षांत आल्यानंतर भारत सरकारने त्यामध्ये सुधारणा करुन पुढीलप्रमाणे बाबींचा उल्लेख केलेला आहे.

**(1)** स्त्रियांचे उपक्रम हे लघुउद्योग,उद्योगाशी संबंधित सेवा किंवा व्यावसायिक उपक्रम हया स्वरुपाचे असू शकतात.

**(2) स्त्रियांच्या उद्योगांचे संघटन व्यक्तिगत मालकीचे उपक्रम,भागीदारी किंवा खाजगी मर्यादित संस्था हयापैकी कोणत्याही पध्दतीचे करण्यात आलेले असावे.**

**(3) स्त्रियांच्या उद्योगांचा कारभार प्रत्यक्षात एक किंवा जास्त स्त्रियांकडून सांभाळण्यात येत असावा**

**(४) उद्योगांच्या भांडवलामध्ये, स्त्रियांचे भांडवल व्यक्तिशः किंवा संयुक्तपणे कमीतकमी 51 टक्के** असणे आवश्यक आहे.

**यशस्वी स्त्री उद्योजकः**–स्त्रियांनी उद्योजक बनण्याशी संबंधित अशा अनेक धोरणांना छेद देणारे निष्कर्ष एका संशोधनपर अभ्यासातून निष्पन्न झाले आहे. राष्ट्रीय उद्योजकता व लघु व्यवसाय विकासाच्या राष्ट्रीय संस्थेने गुरुग्राम (गुडगाव)येथील व्यवस्थापन विकास संस्थेच्या साहाय्याने दिल्ली,फरिदाबाद,गुरुग्राम गाझीयाबाद व नोयडा हया शहरातील 60 यशस्वी स्त्री उद्योजकांची पाहणी केली.हया उद्योजकांपैकी 45 टक्के स्त्री उद्योजक दिल्ली येथील,25 टक्के उत्तर प्रदेशातील व 30 टक्के स्त्री उद्योजक हरियाणा राज्यातील होत्या.

यशस्वी स्त्री उद्योजकाच्या पाहणीमधून खालील वैशिष्टये आढळून आले.

(1) स्त्री उद्योजकांची वयाप्रमाणे वर्गवारी केली,त्यात असे आढळून आले की,36ते45 या वयोगटातील 56.2 टक्के स्त्री उद्योजक होत्या. तर 25 वर्षापेक्षा कमी वय असणा–या स्त्री उद्योजकांची 2.2 टक्के आणि 55 वर्षापेक्षाजास्त वय असणा–याची टक्केवारी ही 4.2 येवढी होती.

(2) स्त्री उद्योजकामध्ये 82.4 टक्के स्त्रिया हया विवाहित होत्या,4.2टक्के हया घटस्फोट झालेल्या होत्या,8.4टक्के विधवा तर 2टक्के हया अविवाहित स्त्री उद्योजक दिसून आल्या.

**स्त्रियांच्या उद्योजकतेला साहाय्य करणारे घटकः–**

**1: स्त्रियांमध्ये असलेले उपजत गुण**– नेतृत्व शैली,शांत व सहनशील स्वभाव,इतरांचा अहंकार न दुखविता किंवा कोणतेही तणाव अथवा संघर्ष निर्माण होवू न देता त्यांचा उपयोग करुन घेण्याची क्षमता, अशा विभिन्न गुणवैशिष्टयांमुळे स्त्री उद्योजक आपले कार्य उच्च कार्यक्षमतेने करु शकतात.

**2: सामाजिक वातावरणामध्ये घडून आलेले बदल–** शिक्षणाचा खूप झपाटयाने प्रसार घडून येत आहे.आजच्या पिढीतील पुरुषांचा स्त्रियांच्या प्रति असलेला दृष्टीकोण विकसित झालेला आहे. सरकारने स्त्रियांना उच्च शिक्षणाच्या निःशुल्क सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत. वाढती महागाई,जीवनमान वाढविण्याची आकांक्षा,इ. कारणांमुळे स्त्रियांना अर्थार्जन करण्यासाठी उंबरठयाच्या बाहेर पडणे भाग आहे. नोकरीच्या संधी मर्यादित असल्यामुळे पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना स्वयंरोजगाराच्या क्षेत्राकडे अपरिहार्यपणे वळणे भाग आहे.

**3: स्त्रियांची चळवळ**– स्त्रियांची उद्योजकता हया विषयांवर सर्व पातळयांवरुन चर्चा केली जात आहे. स्त्रियांचे जागतिक पातळीवरील पहिले अधिवेशन 1975 साली मेक्सिकोमध्ये,दुसरे अधिवेशन कोपनहेगन येथे 1980 मध्ये,तिसरे अधिवेशन 1985 साली नैरोबी येथे व चौथे अधिवेशन 1996मध्ये चीनमध्ये बेजींग येथे भरविण्यात आले.हया सर्व अधिवेशनांमध्ये स्त्रियांचे शिक्षण

व रोजगाराच्या सोयी हयावर होणा—या चर्चेचा स्त्रिया व सउद्योजकता या संदर्भात सरकारी पातळीरून चालणा—या विचारमंथनावर व पर्यायाने स्त्रियांच्या उद्योजकता चळवळीला बळ मिळते.

**4: स्त्री उद्योजकांच्या संघटना**— देशाच्या व जागतिक अशा दोन्ही पातळयांवर स्त्री उद्योजकांच्या संघटना कार्य करीत आहेत.तरुण उद्योजकांच्या राष्ट्रीय संघटनेची एक स्वतंत्र शाखा जी केन्द्रीय व राज्य सरकारांनी स्त्री उद्योजकांना सवलती व निशुल्क सोयी प्रदान कराव्यात, स्त्री उद्योजकांनी हया सर्व सोयींचा पुरेपूर उपयोग करून घ्यावा, तसेच स्त्री उद्योजकांची राष्ट्रीय परिषद ही संस्थादेखील स्त्री उद्योजकतेच्या वाढीसाठी झटते आहे.

**5: सरकारी पातळीवरुन देण्यात आलेल्या सवलती**— हा स्त्रियांच्या उद्योजकतेला साहाय्य करणारा सर्वात महत्त्वाचा घटक आहे.उदा.राष्ट्रीयकृत बॅन्का व राज्यवित्तिय महामंडळे स्त्री उद्योजकांना प्राधान्याने कर्जपुरवठा करतात. तत्परतेने कर्जे,सबसिडी व अनुदाने देतात. राज्यपातळीवरील सरकारी यंत्रणा स्त्री उद्योजकांना तांत्रिक सल्ला साहाय्य देतात.शिवाय स्त्रियांमध्ये उद्योजकतेची प्रवृत्ती वाढावी याकरिता विविध कार्यक्रमाचे आयोजन करत.

**स्त्री उद्योजकांच्या समस्याः—**भारतामधील उद्योजकांपुढे ज्या सर्वसाधारण समस्या आहेत,त्या सर्व समस्या स्त्री उद्योजकांपुढे निश्चितच आहेत.

**1) सिध्दी प्रेरणेचा अभाव**ः—मानसशास्त्रज्ञांच्या मते व्यक्तींना उद्योजक बनण्यासाठी अभिप्रेरित करणारी सर्वात महत्त्वाची प्रेरणा म्हणजे सिध्दी प्रेरणा होय. स्त्रियांमध्ये सिध्दी प्रेरणेची पातळी मुळातच कमी असल्यामुळे उद्योजक बनून स्वतंत्रपणे काही आर्थिक स्वरुपाचे कार्य करण्याचा विचारही येत नाही.तेव्हा त्यांना अभिप्रेरित कसे करणार?ज्या स्त्रियांना पुरुषांची सावली बनून राहण्यातच आयुष्याचे सार्थक वाटते.अशा स्त्रियांना उद्योजकीय प्रशिक्षण कसे देणार?स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे घराच्या उंबरठयापुरतेच मर्यादित असते.स्त्रियांना कोणतेही स्वातंत्र्य नसते. पडदा न घेणा—या स्त्रिया सुध्दा कान असून ऐकू शकत नाही,डोळे असून पाहू शकत नाहीत व बुध्दी असून ती वापरु शकत नाहीत. म्हणून भारतामधील स्त्रियांच्या उद्योजकजेला एखाद्या साचलेल्या डबक्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

**2) जोखीमीची जबाबदारी स्वीकारण्याच्या क्षमतेचा अभाव**ः—आयुष्यभर पुरुषांवरच अवलंबून राहणा—या स्त्रियांच्या मनात आत्मविश्वास कसा उत्पन्न होणार?आपण दुर्बळ आहोत,आपण काहीच करु शकत नाही,हया भावनेने स्त्रियांच्या मनात मूळ धरलेले असते. त्या उद्योजकतेचे आवाहन स्वीकारण्याकरिता अपात्र ठरतात.पुरुषांचा आधार घेवून ज्या स्त्रिया उद्योजक बनतात,त्यांनाही पुरुष नातलगावर आणि पुरुष सहका—यांवर कायमचे अवलंबून राहणे भाग पडते. अशा परिस्थितीमध्ये आपल्या देशामध्ये स्त्रियांच्या उद्योजकतेचा विकास कसा घडून येणार?

**3) निरुपयोगी शिक्षण**ः—उच्च शिक्षणामुळे व्यक्तींचे व्यक्तीमत्व साकारते.पण आपल्या देशातील स्त्रियांनी उच्च शिक्षण घेतले तरी मुळातच हे शिक्षण अत्यंत पुस्तकी असल्यामुळे ते कुजकामी असते.व्यवसायामध्ये वळोवेळी निर्माण होणा—या समस्यांचे नीट आकलन होण्याच्या दृष्टीने तसेच हया समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षणाचा संबंधित स्त्रियांना म्हणावा तसा उपयोग होत नाही.

**4) कौटूंबिक जबाबदारी**ः—स्त्री व पुरूष हे दोघेही कुटुंबाचे घटक.पुरूषाने काम करुन पैसे मिळवून आणले की पुरुषाची जबाबदारी संपली असे मानले जाते.स्त्रियांचे मात्र असे नाही.त्यांच्या जबाबदा—या निरंतर वाढत जाणा—या असतात.

**5) भांडवलाची कमतरताः—**स्त्री उद्योजकांच्या मनाविरुध्द थोडे जरी काही झाले, त्यांच्या मार्गात अडचणी आल्या किंवा त्यांना अपयश आले तर स्त्री उद्योजक आपला उद्योग किंवा व्यवसाय केंव्हाही बंद करतील व पुन्हा गृहिणी बनून आपले जीवन जगू लागतील अशी एक धारणा प्रचलित असल्यामुळे बॅका,वित्तीय संस्था,सावकार स्त्रियांना अल्पमुदतीसाठी कर्जपुरवठा करण्याचे टाळतात.

**6) जास्त उत्पादन खर्चः—**वस्तूची किंमत ब—याच प्रमाणात त्या वस्तूच्या उत्पादनखर्चावर अवलंबून असते. आणि उत्पादनखर्च हा त्या वस्तूचा निर्मिती खर्च व बाजार खर्चावर अवलंबून असतो. पुरूष उद्योजकांच्या तुलनेमध्ये स्त्री उद्योजकांनी संचालित केलेल्या उद्योगांमध्ये तुलनेने उत्पादनखर्च जास्त असतो.

**7) समाजाकडून होणारा विरोध**ः—आपल्या देशातील समाजव्यवस्था पुरूषप्रधान आहे.ज्या समाजात स्त्रियांचे घराच्या उंबरठयाबाहेर पडणे हे असामाजिक व अनैतिक कृत्य मानले जाते, तेथे स्त्रियांनी उद्योजक बनून स्वतंत्रपणे व्यवसाय करण्याच्या विचाराने समाजाकडून,मनापासून स्वागत होणे फार अवघड आहे. स्त्री उद्योजकांना सर्व पातळयांवरुन,खुला किंवा छुप्या स्वरुपात ,पध्दतशीरपणे विरोध करण्यात येत असल्यामुळे,आपल्या देशात स्त्रियांच्या उद्योजकतेची प्रगती वेगाने घडून येत नाही.

**निष्कर्षः—** जगभरात महिलांनी उद्योजकतेत आपला ठसा उमटवला आहे.अपारंपरिक उद्योगांमध्ये भारतात महिला पुढे आहेत.तरीही महिलांच्या उद्योजकतेला अद्याप तितके प्रोत्साहन मिळत नसल्याचे मास्टरकार्ड इंडेक्स ऑफ विमेन आंत्रेपरेनर्स या अहवालात नमूद करण्यात आले आहे.यासाठी 54 देशोचा किंवा अर्थव्यवस्थांचा आढावा घेण्यात आला.त्यात भारताला 41.7 गुणांक मिळून त्याचा क्रमांक 49वा लागला आहे.54 देशांना असे

क्रमांक देताना मास्टरकार्डने आशिया–प्रशांत,मध्यपूर्वेकडील देश व आफ्रिका,उत्तर अमेरिका,लॅटिन अमेरिका व युरोप येथील देशांचा विचार केला. जगातील एकूण महिला कामगारांमध्ये या प्रदेशात 78.6 टक्के महिला मनुष्यबळ आहे.

भारतात महिलांना उद्योजक बनण्यासाठी कमी संधी आहेत,त्याचप्रमाणे एखाद्या उद्योगाचे नेतृत्व करण्यासाठीही कमी वाव आहे,असे हा अहवाल सांगतो. शिक्षणाचा अभाव,तंत्रज्ञानाविषयक अज्ञान, संस्कार व चालीरीतींचा नको इतका पगडा यांमुळे भारतात महिलांमध्ये उद्योजकता रुजवण्यात अडचण येत आहे.

महिला उद्योजकतेचे देशात प्रमाणःन्यूझीलंड 74.4,कॅनडा 72.4, अमेरिका 69.9 भारत 41.7 युगांडा 34.8 बांगलादेश 31.6 व्हिएतनाम 31.4 टक्के आहे.

भारतात महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यात आपण कमी पडत आहोत. देशातील महिलांमध्ये उद्योजक होण्याची प्रचंड क्षमता आहे.( सुकन्या मिश्रा,वरिष्ठ उपाध्यक्ष,मास्टरकार्ड ॲडव्हायझर्स)म.टा. 8 मार्च 2017

संदर्भः

डॉ.प्रभाकर देशमुख
महाराष्ट्र टाईम्स्

❖❖❖❖